**सत्र खटला क्र. ४६/२०२४ मधील फौजदारी जामीन अर्ज**

**भुषण सुरेश खरात**
**वि.**
**महाराष्ट्र शासन**
**(CNR NO. MHBU20-000700-2024)**

## नि.क्र. ९ खाली आदेश
## (पारीत दिनांक २९ नोव्हेंबर २०२४)

**०१]** अर्जदार – **भुषण सुरेश खरात** याने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३९ अन्वये पोलीस ठाणे, जानेफळ येथील अपराध क्र. २०४/२०२४, कलम ३६४, ३६५, १२०(ब), ३०२ सह कलम ३४ भा.दं.वि. खालील प्रकरणात नियमित जामीन मिळण्यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला.

**०२]** अभियोग पक्षाच्या कथेनुसार फिर्यादीचे पती दिलीप इंगळे हे पैशाचा पाऊस पाडत होते. त्यामुळे दिलीप इंगळे आणि अमोल राजपुत यांचे मध्ये काही दिवसांपासून पैशाच्या व्यवहारावरून वाद चालू होता. म्हणून आरोपी अमोल राजपुत याने कट रचून, पूर्व नियोजन करून दिनांक २२.०६.२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजताच्या सुमारास संदीप उर्फ बाबुराव शेवाळे, योगेश तोंडे, शेख साजिद शेख अजीस यांच्या मदतीने संदीप दातार याची स्वीफ्ट गाडी क्र. एम.एच.–२८–बी.एच. १८२४ या वाहनात फिर्यादीच्या पतीला घातपात करण्याच्या उद्देशाने किंवा जिवे मारण्याच्या उद्देशाने जानेफळ येथून कोपरगाव, जि. अहमदनगर येथे नेले. त्यानंतर या आरोपींनी इतर अज्ञात इसमाच्या सहाय्याने फिर्यादीच्या पतीचे अपहरण घडवून आणल्याचे जबाबात सांगितले. फिर्यादी हिने पोलीस ठाणे, कोपरगाव, जि. अहमदनगर येथे फिर्याद दाखल केली. सदर फिर्याद पोलीस ठाणे, जानेफळ येथे ऑनलाईन पाठवण्यात आली. तपासादरम्यान फिर्यादीच्या पतीची निर्घृण हत्या करण्यात आली असल्याचे निष्पंन्न झाले. त्यामुळे पोलीस ठाणे, जानेफळ येथे अपराध क्र. २०४/२०२४ कलम ३६४,३६५,१२०(ब), ३०२ सह कलम ३४ भा.दं.वि. खाली गुन्हा नोंदवण्यात आला.

०३] अर्जदाराच्या वतीने विद्वान विधिज्ञ श्री. जी. डी. ठाकरे यांनी युक्तिवाद केला की, अर्जदार हा निर्दोष असून त्याचा या गुन्ह्याशी कोणताही संबंध नाही. अर्जदारातर्फे पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की, अतिरिक्त न्यायीक कबुली जबाबाच्या आधारावर फिर्यादीने विचारपूर्वक खोटी फिर्याद पोलीस ठाणे, जानेफळ येथे दाखल केली. अर्जदाराचे नाव फिर्यादीत नमूद नाही. अर्जदाराला दिनांक ११.०७.२०२४ रोजी अटक करण्यात आली असून त्याची ८ दिवस पोलीस कोठडी घेण्यात आली होती. इतर आरोपींच्या बयाणावरून अर्जदाराचे नाव या गुन्ह्यात गोवले आहे. परंतु आरोपींचे पोलिसांपुढील बयाणाला कोणतेही कायदेशीर महत्त्व नाही. अर्जदाराला अटक केल्यानंतर अर्जदाराच्या नावाचे खोटे बिल तयार करण्यात आले आहे.

०४] अर्जदारातर्फे पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की, अभिलेखावरील बयाण व कागदोपत्री पुराव्यानुसार अर्जदार मयताला मारहाण करत असतांना, त्याचे अपहरण करतांना, त्याचा मृतदेह नस्ती करतांना हजर असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे फिर्यादीच्या पतीच्या मृत्यूशी अर्जदाराचा संबंध जोडता येत नाही. मृतकाला ज्या दांड्याने मारहाण केली त्याच्या बिलावर अर्जदाराचे नाव असल्याने अर्जदाराला परिस्थिती जन्य पुराव्याच्या आधावरील खोट्या गुन्ह्यात कोणत्याही कारणास्तव गोवले आहे. अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो जामीन आदेशावरील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. अर्जदाराविरूद्ध संपूर्ण तपास संपलेला असून त्याच्याविरूद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. अर्जदाराचा जामीन अर्ज नामंजूर करण्यासाठी अभियोग पक्षाने सादर केलेली कारणे संयुक्तिक नाही. अर्जदाराचा प्रथम दर्शनी या गुन्ह्यात सहभाग दिसून येत नाही. म्हणून अर्जदाराला सशर्त जामीन देण्याची विनंती करण्यात आली.

०५] याउलट, विद्वान सरकारी वकील श्री. जे. एम. बोदडे यांनी तपासी अंमलदाराच्या म्हणण्यावर जोर देऊन जामीन अर्जांवर प्रखर आक्षेप घेतला. त्यांनी युक्तिवाद केला की, प्रस्तुत प्रकरण हे अपहरण आणि हत्येचे असून परिस्थितीजन्य पुराव्यावर आधारीत आहे. अज्ञात आरोपींविरूद्ध तपास हा प्रारंभीक अवस्थेत आहे. मोबाईल आणि बोलेरो जीप जप्त होणे बाकी आहे. अर्जदाराचा या गुन्ह्यात प्रथम दर्शनी सहभाग आहे. तसेच

या गुन्ह्यात इतर अज्ञात आरोपींचा देखील समावेश आहे. त्यामुळे अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो तपासात अडथळा निर्माण करू शकतो व फरार / अज्ञात आरोपींची अटक टाळू शकतो. तसेच अर्जदार साक्षीदारांना फितूर करू शकतो. म्हणून अर्जदाराचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०६] प्रस्तुत प्रकरण हे अपहरण आणि हत्या करण्याचे असल्याने गुन्ह्याचे स्वरूप अत्यंत गंभीर आहे. या प्रकरणातील मयत दिलीप इंगळे याची पाईपाच्या सहाय्याने निर्घृण हत्या करण्यात आली आहे. हत्येकरिता षडयंत्र रचण्यात येऊन बऱ्याच आरोपींची मदत घेण्यात आली आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरण हे अतिशय गंभीर स्वरूपाचे आहे. इथे महत्त्वपूर्ण बाब नमूद करण्यात येते की, प्रकरणात वापरण्यात आलेले पाइप अर्जदाराच्या नावाने दिनांक २२.०६.२०२४ रोजी खरेदी केल्याची पावती हस्तगत करण्यात आली असून त्यानंतर आरोपीला दिनांक ११.०७.२०२४ रोजी अटक करण्यात आली आहे. सदरहू पावती या प्रकरणातील आरोपी बाबू मारोती नाळे याच्या बयाणावरून जप्त करण्यात आली. आरोपी बाबू नाळे याच्या बयाणात अर्जदाराला उल्लेख आहे. त्यामुळे अर्जदाराचा या गुन्ह्याशी प्रथम दर्शनी संबंध असल्याचे कागदोपत्री पुराव्यावरून दिसून येते.

०७] या प्रकरणात बुलढाणा, अहमदनगर, शिर्डी, बारामती, कर्जत येथील विवीध व अज्ञात आरोपींचा सहभाग असून गुन्ह्याचे स्वरूप क्लिष्ट आहे. त्यामुळे सर्व आरोपींच्या अटकेनंतर पुराव्याची जुळवा–जुळव होऊन प्रत्येक आरोपीचे कृत्य स्पष्ट होणार आहे. परिणामी अर्जदाराच्या कोठडीची आवश्यकता भासणार आहे. याशिवाय अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो फरार होऊ शकतो आणि साक्षीदारांवर दबाव आणू शकतो. शिवाय अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो फरार आरोपी व अज्ञात आरोपींना पलायन करण्यास मदत करू शकतो.

०८] याशिवाय अर्जदाराने केलेल्या गुन्ह्यात मृत्यूदंडाची तरतूद आहे. म्हणून गुन्ह्याचे स्वरूप, गंभीरता, गुन्ह्यासाठी असलेली शिक्षेची तरतूद, अर्जदाराचे कृत्य आणि तपासाची स्थिती पाहता अर्जदाराचा जामीन अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. करिता पुढील आदेश पारित करण्यात येतो.

**– आ दे श –**

जामीन अर्ज (नि.क्र. ९) नामंजूर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात लिखित व घोषित)

Digitally signed by SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Date: 2024.11.30 17:43:30 +0530

**(सागर कृ मुंगीलवार)**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश**
**मेहकर**

**दिनांक – २९.११.२०२४**
**ठिकाण – मेहकर**

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – श्री. सागर कृ मुंगीलवार,
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मेहकर.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक ग्रेड – २, मेहकर

दिनांक – २९.११.२०२४